हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
Mob. 8208427524
Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मोठ्या राज्यात भाजपाचा विजय? - शरद पवार

पुणे - विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर फारसे सार्वजनिक मंचावर न दिसलेले शरद पवार आता पुन्हा सक्रिय झाले आहेत. आज कोल्हापूर येथे पत्रकार परिषद घेऊन त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या निकालावर भाष्य केले. तसेच उद्या मारकडवाडी येथे जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधणार असल्याचे सांगितले. निवडणुकीत यश मिळाल्यानंतर एक उत्साहाचे वातावरण असते. पण मला महाराष्ट्रात तसे वातावरण दिसत नाही. पण मी उगीचच आरोप करणार नाही. कारण माझ्याकडे अधिकृत माहिती नाही. आम्ही फक्त मतदानाची आकडेवारी गोळा केली आहे. प्रत्येक राजकीय पक्षाला एकंदर किती मते मिळाली आणि त्यांचे किती लोक निवडून आले, असे सांगून शरद पवारांनी विधानसभेच्या निकालाचे विश्लेषण केले.

निकालाबाबत पुढे बोलत असताना शरद पवार यांनी हेही स्पष्ट केले की, ईव्हीएमवर आमची शंका नाही. कारण त्यासंबंधी ठोस असे पुरावे माझ्या हातात नाहीत. पण मतदानाच्या आकडेवारीवरून काही प्रश्न निर्माण होत आहेत. शरद पवार पुढे म्हणाले, काँग्रेस पक्षाला ८० लाख मते पडली आणि त्यांचे फक्त १६ आमदार निवडून आले. तर शिवसेना शिंदे गटाला ७९ लाख मते मिळाली आहेत, तर त्यांचे ५७ आमदार निवडून आले आहेत. म्हणजे एक लाख कमी मतदान मिळूनही जवळपास ४१ आमदार अधिक निवडून आले आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची मते ७२ लाख आहेत. पण आमदार निवडून आले फक्त १० आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला ५८ लाख एवढे मतदान मिळाले, पण त्यांचे ४१ आमदार निवडून आले आहेत.

शरद पवार म्हणाले, आकडेवारीतून काही गोष्ट दिसत असल्या तरी आमच्याकडे अधिकृत अशी काही माहिती नाही. त्यामुळे मी आज तरी ईव्हीएमवर शंका घेत नाही. हे फक्त मतांचे आकडे असून ते आश्चर्यकारक आहेत. विधानसभेचे अधिवेशन सुरू झाले. तिथे सत्ताधारी आमच्यावर टीका करत होते. ‘लोकसभेला ईव्हीएम ची तक्रार नव्हती, आताच ईव्हीएम विरोधात तक्रार का करता?’ असा युक्तीवाद सत्ताधारी करत असल्याचे मी ऐकले. पण मागच्या दोन महिन्यात चार निवडणुका झाल्या. त्यावरून सांगतो, हरियाणामध्ये भाजपाची अवस्था अतिशय वाईट होती, पण तिथे त्यांचा विजय झाला. जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेसला फारसे यश मिळाले नाही, तिथे नॅशनल कॉन्फरन्सला



यश मिळाले. महाराष्ट्रात भाजपाचा विजय झाला आणि आमचा पराभव झाला. पण त्याचवेळेला झारखंडमध्ये त्यांचा पराभव झाला.

या चारही राज्याच्या निकालावरून सत्ताधारी हे म्हणू शकतात की, दोन निवडणुकीत एका ठिकाणी तुम्ही जिंकलात आणि दुसरीकडे आम्ही जिंकलो. त्यामुळे ईव्हीएमचा काही संबंध नाही. पण त्यातून असे दिसते की, मोठ्या राज्यात भाजपाचा विजय झाला आहे, तर छोटी राज्ये विरोधकांकडे गेली आहेत, असेही शरद पवार म्हणाले.

पराभवाचे विश्लेषण करताना शरद पवार म्हणाले, महाविकास आघाडी यापुढील काळातही एकत्रित निवडणुकांना सामोरे जाणार आहे. पराभव झाला म्हणून नाउमेद व्हायचे नसते. निवडणुकीला काही पर्याय नसतो. मी आयुष्यात १४ निवडणूक लढलो, मला कधीही पराभव पाहावा लागला नाही. पण यावेळेला राज्यात आम्हाला पराभव पाहायला मिळाला. जरी पराभव आला तरी चिंता करायची नसते. लोकांमध्ये जावे लागते आणि लोक चिंताग्रस्त आहेत, असे आम्हाला दिसते. लोकांमध्ये उत्साह दिसत नाही. निवडणूक झाल्यानंतर एक उत्साह दिसतो, तो मात्र यावेळेला दिसत नाही.

माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मारकडवाडीतील लोक मतपत्रिकेवर मतदान घेण्यासाठी ग्रामस्थ इच्छुक आहेत. पण प्रशासनाने त्यास विरोध दर्शविला. प्रचारावेळी निवडणुकीची सभा बघूनच कोणता उमेदवार जिंकणार हे कळते.

कोल्हापूरमध्येही आमच्या उमेदवारांच्या सभा जोरदार झाल्या. पण त्यांचा पराभव झाला. राज्यात मुख्य निवडणूक प्रक्रिया होऊन गेली आहे. त्यामुळे एखाद्या गावाने जर त्यांच्या पद्धतीने मतदान घेण्याचा निर्णय घेतला असेल तर त्यावर बंदी कशासाठी आणि कोणत्या कायद्याद्वारे? १४४ सारखे कलम लावण्याची गरजच काय? त्यामुळे गावातल्या लोकांचे नेमके म्हणणे काय आहे, यासाठी मी मारकडवाडीत जाणार आहे, असे शरद पवार यांनी कोल्हापूर येथील पत्रकार परिषदेत सांगितले.

युवा आदर्श

## संधी ...

संप्पन्न शपथ विधी
अंती मिळाली गादी
हलू लागली तिजोरी
बराच खर्चला निधी
सत्कार सोहळे पुरे ते
कर्तव्यपूर्तता आधी
खाती वाटावी सत्वर
योग्य असो प्रतिनिधी
विरोधीपक्षा सन्मान
नको असूया व्याधी
वैर धुमाळी सरलेली
शाबूत विचार बुध्दी
नवीन संकल्पपूर्ती
असावे वास्तववादी
दुश्मनी इतिहास जमा
घात करेल वादावादी
जिंकून दिले कष्टांनी
जपा आपली प्यादी
धन्यवाद जन सागरा
उपकार अनंत अनादि
सकारात्मक भूमिका
भावना नको अपराधी
सद्उद्येशा साथ देती
तेच कार्यक्षमविरोधी
वाट पाहते आतुरतेने
कामाची वाढती यादी
सर्वासोबत घेऊ चाले
रे गोष्ट नसते ही साधी
सहयोग गुरूकिल्ली
कर्म योग दावा जिद्दी
संविधान हे सर्वोत्तम
हो लोकशाही समृध्दी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा झाडे जगवा

# लाडकी बहिण योजनेतील वयाची अट रद्द करा - ॲड. अश्विनी धन्नावत

## लाडक्या बहिणींसाठी समान संधीच ठरेल सक्षमीकरणाच्या दिशेने सकारात्मक पाऊल

**जालना । प्रतिनिधी -** लाडकी बहिण योजनेसाठी २१ ते ६५ वर्षापर्यंतच्या वयाच्या अटीमुळे १८ वर्षाच्या वयाच्या बहिणी व वयोवृध्द बहिणींना या योजनेपासुन वंचीत रहावे लागत असल्याने, वयाची अट रद्द करण्यात यावी, अशी मागणी ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनच्या अध्यक्ष ॲड. अश्विनी धन्नावत यांनी एका निवेदनाद्वारे नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

> लाडकी बहिण योजना ही महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी आणि सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण असल्याने वयाची अट रद्द केल्यास या योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचेल. १८ वर्षांवरील आणि ६५ वर्षांवरील सर्व वयोगटांतील महिलांना समान संधी मिळेल, आणि ही बाब महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने सकारात्मक पाऊल ठरणार असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला व बालकल्याण विभागाकडे प्रलंबित असलेल्या माझ्या अर्जावर त्वरित कार्यवाही लाडकी बहीण योजनेतील वयोमर्यादा रद्द करावी, असे ॲड. अश्विनी धन्नावत यांनी म्हटले आहे.

यासंदर्भातील निवेदनात ॲड. अश्विनी धन्नावत यांनी म्हटले आहे की, वयाच्या १८ व्या वर्षी मुलगी मतदानासाठी पात्र होते. लग्नासाठी हेच वय योग्य मानले जात असल्याने अनेक पालक १८ वर्षानंतर लग्न लावून देतात. त्यामुळे लाडकी बहिण योजना त्या वयापासुन लागू केली तर तिला उच्च शिक्षण घेण्यास मदत होईल व घरातील मंडळी लग्नासाठी आग्रह करणार नाही. ती स्वावलंबी होवुन लग्न करू शकेल. ६५ वर्षावरील वृध्द महिलांना सुध्दा योजना लागू होणे गरजेचे आहे. कारण या वयातच त्यांना खरी गरज आहे. त्यातून त्यांना औषधोपचार घेता येतील. वाढत्या वयात त्यांना योजनेतुन वगळल्याने आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे वयाची अट रद्द करण्याबाबत १९ सप्टेंबर रोजी मंत्रालयात जाऊन लाडकी बहीण योजनेतील वयाची अट रद्द करण्याबाबतची मागणी एका तक्रार अर्जाद्वारे (तक्रार क्र. ७३३६५८६) केली होती. हा अर्ज सध्या राज्याच्या महिला



व बाल कल्याण विभागाच्या एमडब्ल्युसी डेस्क क्र. २ वर प्रलंबीत आहे. आजपर्यंत यावर कार्यवाही झाली नाही. त्यामुळे ॲड. अश्विनी धन्नावत राज्याचे निर्वाचित मुख्यमंत्री यांना पुन्हा निवेदन पाठवून लाडकी बहीण योजनेतील वयाची अट रद्द करण्याची विनंती केली आहे.

# चांगल्या माणसाची संगत केल्याने जीवनाचे कल्याण होते- हभप बाळू महाराज

**जालना । प्रतिनिधी -** वाईट माणसाची संगत केली की वाईटच होते तर चांगल्या माणसाची संगत केली की जीवनाचे कल्याण होते असे प्रतिपादन हभप बाळू महाराज गिरगावकर यांनी काल्याच्या कीर्तनातून बोलतांना केले बदनापूर तालुक्यातील सायगाव डोंगरगाव येथील श्रीक्षेत्र पावनधाम आश्रम येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात ते बोलत होते पुढे बोलतांना महाराज म्हणाले की माणसाला मोठे व्हायचे असेल तर चांगली माणसे जवळ ठेवा चांगली माणसे जवळ नसतील तर आठवड्यातून किमान एक दिवस तरी चांगल्या माणसासोबत रहा, जो दुसऱ्याच्या मदतीला धावून जातो त्याला मोठी माणसे म्हणतात,



दुःख नाही असा जगात एकही माणूस नाही, असे कोणते औषध नाही की त्यापासून दुःख दूर करता येते, परंतु संतांनी दुःख दूर करण्यासाठी अत्यंत सुलभ असे औषध निर्माण केले असून ते फक्त भगवंताचे नामस्मरण आहे नामस्मरण केल्याने **पान २ वर**

# जालना येथे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.१६ डिसेंबर २०२४ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वतःचा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योग या बाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे,कच्चामाल,साहीत्य,कॅपीसिटी,जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, **पान २ वर**

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त स्थलांतरित मतदारांची ईव्हिएम विरोधी स्वाक्षरी मोहीम



**मुंबई -** वंचित बहुजन आघाडी कडून राज्यव्यापी ईव्हिएम विरोधी स्वाक्षरी मोहिम ३ ते १६ डिसेंबर २०२४ दरम्यान राबविण्यात येत आहे .याच पार्श्वभूमीवर महामानव डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दिनांक ६ डिसेंबर २०२४ रोजी चारकोप मुंबई येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करून जालना जिल्ह्यातील स्थलांतरित मतदारांची स्वाक्षरी मोहिम वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांच्या स्वाक्षरीने सुरुवात करण्यात आली आहे,यावेळी रामेश्वर डोके, विलास डोके, प्रकाश हिवाळे, ज्ञानदेव जाधव यांच्या सह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. जालना **पान २ वर**

# ब्रह्माकुमारी सरिता राठी यांचे ग्रहांशी मैत्री- जीवनात सुख, शांती या विषयावर व्याख्यान

## आज महेश व्याख्यानमाला; महेश नागरी पतसंस्थेतर्फे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महेश नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे रविवार दिनांक ८ डिसेंबर रोजी मंठा रोडवरील महेश भवन येथे दुपारी ३.३० ते सायं. ७.३० या वेळेत आयोजित महेश व्याख्यानमालेत आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मोटिव्हेशनल स्पीकर ब्रह्माकुमारी सरिता राठी यांचे ग्रहांशी मैत्री म्हणजे जीवनात सुख-शांती या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

ब्रह्माकुमारी सरिता राठी ह्या त्यांच्या प्रभावी संवादशैली आणि मार्गदर्शनाने लाखो लोकांच्या जीवनाला सकारात्मक दिशा देणाऱ्या प्रेरणादायी वक्त्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या मते, आपल्या कुंडलीतील ग्रह आपले नातेसंबंध, आरोग्य, आर्थिक स्थिती आणि मनःशांतीवर थेट परिणाम करत असतात. ग्रहांच्या सकारात्मक किंवा नकारात्मक स्थितीनुसार आपले जीवन घडते किंवा बिघडते. कमजोर ग्रहांमुळे नात्यांमध्ये तणाव निर्माण होतो, आरोग्याच्या समस्या उद्भवतात, आर्थिक स्थिरतेला धक्का बसतो आणि मनः शांती हरवते. मात्र, योग्य दृष्टिकोन आणि उपाययोजनांच्या माध्यमातून ग्रहांचे संतुलन साधत जीवन सुखमय आणि समृद्ध करता येते.



या व्याख्यानामध्ये ब्रह्माकुमारी सरिता राठी ग्रह बळकट करण्यासाठीच्या सोप्या आणि परिणामकारक उपायांची माहिती देतील. ध्यानधारणा, आत्मचिंतन आणि सकारात्मक ऊर्जेच्या माध्यमातून ग्रहांशी मैत्री कशी साधता येईल, याचा सखोल उलगडा त्या करतील. ही पद्धत कुठल्याही कठीण धार्मिक किंवा ज्योतिषशास्त्रीय विधींवर आधारित नसून व्यक्तीच्या आंतरिक **पान २ वर**

## संपादकीय पान

# बांगलादेशला त्याची जागा दाखवून द्या

१९७१ पर्यंत बांगलादेश हा पाकिस्तानचा एक भाग होता. तेंव्हा त्याला पूर्व पाकिस्तान असे म्हंटले जायचे. पाकिस्तानच्या राजवटीत बांगलादेशातील नागरिकांवर अनन्वित अत्याचार होत होते. बांगलादेश हा पाकिस्तानचा घटक असूनही बांगलादेशी नागरिकांवर पाकिस्तान जुलुम करत होता. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीला कंटाळून बांगलादेशचे तात्कालिन नेते शेख मुजिबिर रहेमान यांनी पाकिस्तानी सरकार विरुद्ध बंड पुकारले. त्यांच्या या बंडास बांगलादेशी नागरिकांनी प्रतिसाद दिला आणि लोक रस्त्यांवर उतरले मात्र पाकिस्तानने दडपशाही मार्गाने हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला तेंव्हा शेख मुजीबिर रेहमान यांनी भारताच्या तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे मदतीची याचना केली. इंदिरा गांधी यांनी तत्काळ बांगलादेशी नागरिकांना पाठिंबा दिला आणि भारतीय लष्कराने पाकिस्तानशी मुकाबला करून बांगलादेशला पाकिस्तानच्या गुलामीतून मुक्त केले. पाकिस्तानच्या निर्मितीत भारताचा मोठा वाटा आहे नव्हे भारतामुळेच बांगलादेशची निर्मिती झाली. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाल्या पासून बांगलादेश आणि भारताचे संबंध मैत्रीचे च राहिले आहेत. मोठ्या भावाच्या रुपात भारताने बांगलादेशला नेहमीच त्यांच्या संकटात मदत केली मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बांगलादेश मधील सध्याचे सरकार आणि बांगलादेशी नागरिक भारताच्या उपकाराला विसरली असून भारतालाच शत्रू मानू लागली आहेत. बांगलादेशात सध्या भारता विरुद्ध मोठा जनक्षोभ पाहायला मिळत आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार पाडून तेथील कट्टरपंथीयांनी सत्ता हस्तगत केली. कट्टरपंथीय, लष्कर आणि जनतेचा रोष पाहून शेख हसीना यांनी भारतात पलायन केले. शेख हसीना यांचे भारताशी सौहार्दाचे संबंध होते म्हणूनच भारताने त्यांना भारतात आश्रय दिला कदाचित हेच तेथील नवनियुक्त सरकारला आणि कट्टरपंथीयांना रुचले नसावे म्हणूनच त्यांनी बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्यांक नागरिकांना लक्ष करण्यास सुरुवात केले. गेल्या काही महिन्यात बांगलादेशातील हिंदू मंदिरांवर आणि हिंदू नागरिकांवर हल्ले होऊ लागले. मागील काही महिन्यात बांगलादेशात हिंदूवरील हल्ल्याच्या ३०० घटना घडल्या आहेत. यात काही नागरिकांना जीव देखील गमवावा लागला आहे. हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवर जाणीवपूर्वक हल्ले केले जात आहेत. हिंदूंनी बांगलादेश सोडून जावे असे जाहीरपणे इशारे दिले जात आहेत. या कट्टरपंथीय हल्लेखोरांना रोखण्यात तेथील डॉ मोहंमद युनूस यांचे सरकार अपयशी ठरत आहे किंबहुना या हल्लेखोरांना तेच पाठीशी घालत आहेत. बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंचे संरक्षण करणे हे तेथील सरकारचे कर्तव्यच आहे मात्र आपले कर्तव्य विसरून तेथील सरकार कट्टरपंथीयांना मोकळीक देत आहे. इतकेच नाही तर बांगलादेशात भारत विरोधी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. डॉ मोहंमद युनूस हे नोबेल पारितोषिक विजेते आहेत. त्यांची बांगलादेशचा हंगामी पंतप्रधानपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागत केले होते. त्यांच्याकडून न्याय आणि समानतेची अपेक्षा होती मात्र आता ती अपेक्षा फोल ठरली. त्यांच्या कारकीर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे वाटले होते पण त्यांनी मात्र भारताशी पंगा घेण्याचेच ठरवले आहे. बांगलादेश नॅशनलिस्ट पक्षाचे नेते रहुल कबीर रिझवी यांनी आपल्या बायकोची साडी जाळून भारतीय मालावर बहिष्कार घालण्याचे आव्हान केले इतकेच नाही तर भारतीय प्रसार माध्यमांवर देखील बंदी घालण्याचे आव्हान केले. इतके सगळे होत असताना डॉ मोहंमद युनूस या कट्टरपंथीयांवर कोणतीही कारवाई करत नाहीत उलट त्यांची बाजू घेऊन भारतवरच आरोप करीत आहेत म्हणूनच आता बांगलादेशातील हिंदूवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी आणि बांग्लादेशात भारता विरुद्ध वाढणारा जनक्षोभ कमी करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने हस्तक्षेप करावा आणि तिथे शांती सेना तैनात करावी.



भारताने देखील या प्रकरणात बघ्याची भूमिका सोडून अहेसान फरामोश बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यावी.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# बांगलादेशाने अल्पसंख्याकांवरील हल्ले थांबवावे अन्यथा याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील

बांगलादेशात हिंदूसह संपूर्ण अल्पसंख्याक समाज दहशतीच्या वातावरणात वावरत आहे. कारण तीथे शेख हसीना सरकार होती तोपर्यंत संपूर्ण समाज व बांगलादेश सुरक्षित होता.परंतु शेख हसीना यांचा तख्तापलट करण्यासाठी बांगलादेशातील अंतरिम सरकारचे प्रमुख सल्लागार महम्मद युनूसने संपूर्ण हद्दीपार केल्या व बांगलादेशाला रक्ताच्या लाथोळ्यात लोटले व युनूसने बांग्लादेश काबीज केला.यानंरत युनूस सरकार स्थापन झाली व युनुस सरकारने बांगलादेशाला कट्टरतेकडे वळविण्याचे शडयंत्र रचले आणि बांग्लादेशात कट्टरतेकडे बीज रोवले. त्यामुळे आज तेथील हिंदू सह संपुर्ण अल्पसंख्याक समाज दहशतीच्या वातावरणात जगत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.यावर संयुक्त राष्ट्र संघ, अमेरिका, रशिया,ब्रिटन यांनी हस्तक्षेप करून अल्पसंख्याक समाजावर होणारा अत्याचार थांबविला पाहिजे.युनूस हा पाकिस्तानचा मोहरा आहे त्यामुळे तो पाकिस्तानच्या इशाऱ्यावर नाचत आहे. परंतु युनूस सरकारने पाकिस्तानचा पुर्ण अभ्यास केलेला दिसत नाही.कारण आज पाकिस्तान स्वतंत्र होऊन ७७ वर्षे झाली आणि भारतही स्वतंत्र होऊन ७७ वर्षे झालीत म्हणजे दोघेही बरोबरीने स्वतंत्र झाले.परंतु पाकिस्तान आजही रक्ताच्या लाथोळ्यानी माखलेला व भिकेला लागलेला देश आहे त्याठिकाणीच लोकशाही फक्त नावालाच आहे.तेथील संपूर्ण कारभार आतंकवादी, दहशतवादी व कट्टरपंथी यांच्या हातात आहे.त्यामुळे आजपर्यंत पाकिस्तानचा विकास होवू शकला नाही आणि होणारही नाही.कारण पाकिस्तान आतंकवादी संघटनेचे माहेरघर आहे.त्यामुळे सर्वसामान्य व अल्पसंख्याकांचे आजही हालबेहाल होत आहे. तीच परिस्थितीत आज पाकिस्तान बांग्यादेशात करण्याच्या तयारीत आहे आणि त्या पध्दतीने कट्टरवादाचे जाळे विणने सुरू आहे. यावर संयुक्त राष्ट्र संघ, अमेरिका, ब्रिटन, रशिया यांनी ताबडतोब हस्तक्षेप करून अल्पसंख्याकावर होणारे अत्याचार थांबवावे.कारण हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील मुद्दा आहे. बांगलादेशातील कट्टरतावाद हे पाकिस्तानचे बिज आहे.कारण बांगलादेशाच्या मार्फत भारतात आतंकवादी कारवाया सहज करता याव्यात या उद्देशाने पाकिस्तान आपली चाल खेळतांना दिसत आहे.यावर आंतरराष्ट्रीय समुदायाने ताबडतोब अंकुश लावावा अन्यथा भारताकडून कठोर पाऊल उचलले जाऊ शकते यालाही नाकारता येत नाही.जगात सध्या धार्मिक घडी बिघडत चाललेली आहे.मस्टरडॅम पासून पॅरिस पर्यंत आणि लंडन ते न्युयॉर्क पर्यंत स्थलांतरितांचे हिंसक जमाव सध्या सभ्यतेवर हल्ले चढवत आहेत.बांग्लादेशात अशाच हिंसेने थैमान घातल्याचे दिसून येते.बांग्लादेशातील हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार नोबेल विजेते मोहम्मद युनूस ढाक्यात आल्यापासून त्या देशात फाळणीनंतरचा मोठा हिंसाचार उफाळला आहे.गेल्या चार महिन्यांपासून हिंदू आणि अल्पसंख्य समुदायाच्या काही प्रमुख नेत्यांना गजाआड करण्यात आले आहे व कट्टरतावाद प्रस्थापित करण्यासाठी अल्पसंख्यांक समूदायांवर अत्यंत घृणास्पद अत्याचार होत आहे.यामुळे तीथे हिंसेचे वातावरण निर्माण झाले असून अल्पसंख्याक लोकांचा जीव धोक्यात येत आहे. कट्टरपंथी उपद्रवी जाळपोळ,खुनखराबा,लुटपाट, अत्याचार अशा भयावह घटनांना युनूस सरकार सहकार्य करीत आहे.यामुळे सध्या अल्पसंख्याकांच्या बाबतीत अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे.तेथील हिंसाचार पहाता हिंदू सह अनेक अल्पसंख्याक समुदाय तेथुन पलायन करतांना दिसतात. बांगलादेशमधील हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन युनिटी काउन्सिल ने दिलेल्या माहितीनुसार पाच ऑगस्ट पासून आतापर्यंत हिंदूसह अल्पसंख्याकावर २ हजारपेक्षा जास्त हल्ले झाल्याचे सांगितले जाते.यावरून स्पष्ट होते की अल्पसंख्याक समाज असुरक्षित आहे.याची खबरदारी अमेरिका, ब्रिटन, रशिया आणि संयुक्त राष्ट्र संघाने घ्यावी.कारण अनेक धर्मांचे, पंथाचे, जातीचे आणि समाजाचे अल्पसंख्याक विदेशी नागरिक बांगलादेशात रहातात. त्यामुळे बांगलादेशातील हिंसाचार व अत्याचार रोखण्यासाठी संयुक्त राष्ट्रासह अन्य देशांनी योग्य पाऊल उचलले पाहिजे.सोबतच बांगलादेशातील अराजकता पहाता भारत सरकारने कुटणितीच्या माध्यमातून बांगलादेशावर दबाव तंत्राचा वापर करून त्याला योग्य जागा दाखविली पाहिजे. कारण भारताने बांगलादेशाला स्वतंत्र करून दिले, आर्थिक सहाय्य, सैन्य मदत, आपात्कालीन मदत करून शेवटपर्यंत सहकार्याची भूमिका भारताने बजावली.भारताने बांगलादेशाला पाकिस्तान पासून वेगळे करून चांगले जीवन जगण्याची संधी दिली.परंतु आज मोहम्मद युनूसच्या माध्यमातून बांगलादेशने पाकिस्तानचे पाय चाटायला सुरुवात केली आहे. ही बाब भारत कदापि सहन करणार नाही. आज ज्या सापाला दुध पाजून मोठे केले तोच साप आज भारताला डंक मारायला निघाला आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही युनूस सरकारने आतातरी सुधारून जावे अन्यथा पाकिस्तान सारखे हालबेहाल होतील व रक्ताच्या लाथोळ्यात गुरफटून मारल्या जाईल.भारत शांती प्रिय देश आहे त्याच्या वाट्याला जर बांगलादेश गेला तर ना घर का ना घाट का अशी गंभीर परिस्थिती बांगलादेशची भारत करेल.त्यामुळे मोहम्मद युनूस सरकारने आंतरराष्ट्रीय दबाव येण्याच्या अगोदर हिंसेचे थैमान रोखुन अल्पसंख्याक समाजाला सहकार्य करावे व ताबडतोब शांतता प्रस्थापित करावी.अन्यथा बांगलादेशाला त्याची जागा भारत अवश्य दाखवेल.पाकिस्तान आणि बांगलादेश यांची जवळीक पहाता भारताला सतर्क रहाने गरजेचे आहे कारण पाकिस्तान बांगलादेश मार्ग संयुक्तपणे दहशतवादी कारवाया करू शकतात.त्यामुळे पाकिस्तान व बांगलादेशच्या मुसक्या आवळण्याची सुध्दा वेळ आली आहे.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# बुद्ध विहारात वैज्ञानिक दृष्टिकोनातून चर्चा व्हावी - बी बी मेश्राम

## ७७ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजी नगर । प्रतिनिधी -** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने २४ नोव्हेंबर २०२४ ला त्रिरत्न बुद्ध विहार, भारतमातानगर, एन-१२, हडको येथे ७७ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.



या कार्यशाळेला उद्घाटन पर मार्गदर्शन करताना बौद्धाचार्य व्ही. के. वाघ म्हणाले की, धम्म प्रचाराचा उपक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी आपण कटिबद्ध असावे. दररोज विहारात गेले पाहिजे मात्र अपत्यावर बौद्ध संस्कार नसल्याने केवळ वृद्ध व्यक्ती विहारात येतात. लेखन, वाचनासह संभाषणाने वक्तृत्व कला विकसित होते. मंच उपलब्ध करून देणे हे महान कार्य आहे, जे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलने प्रत्यक्षात सुरू केले आहे. जो शीलवान तो बलवान म्हणून काया, वाचा, मनाने आपण शुद्ध झाले पाहिजे. बाह्य स्वरूपाचे आकलन पंच ज्ञानेंद्रियांने होत असले तरी अंतरंगात सुद्धता असायला हवी. शील, समाधी व प्रज्ञा या त्रिसूत्रीची मानवाला प्राथमिक गरज आहे.

याप्रसंगी इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, दर रविवारी बौद्धांनी विहारात गेलेच पाहिजे असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदेशयुक्त संदेश होता. आपण तो आदेश पाळत नसलो तर बाबासाहेबांचे नाव घ्यायचा आपणास काय अधिकार आहे? अधिकाराची पूर्तता करून घेण्यासाठी कर्तव्याचे पालन पण करावे लागत असते.

गौरव दुधमले म्हणाले की, विहारात आल्याने मानसिक आजार कमी होऊ शकतात. एस. एस. वानखेडे म्हणाले की, व्यक्तीच्या आचरणावरून ती व्यक्ती बुद्ध आहे किंवा नाही हे ठरत असते. त्यांनी यावेळी, त्या भीम गौतमाला वंदन करुया। हे गीत सादर केले. भीमराज बोर्डे म्हणाले की, प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनाचा लेखक आहे. आपण जसे वर्तन करू तसेच घडेल.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फ ुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, दक्षिण भारतातील द्रविड व उत्तर भारतातील नाग हे नागवंशीय लोक आहेत. म्हणून त्यांना संघटीत करण्यासाठी आम्ही दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) हे राष्ट्रीय संघटन चालवीत आहोत. २४ नोव्हेंबर १९५६ ला काशी विद्यापीठात मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या' या शंकराचार्याच्या विधानाचा समाचार घेताना ब्रह्म सत्य आहे तर मग पंचज्ञानेंदियाद्वारे मिळालेले व विज्ञानाने शोधलेल्या सत्याचे काय? असा प्रश्न उपस्थित करून वैज्ञानिक दृष्टिकोनातून सत्याकडे वळण्याचा संदेश दिला होता. तसेच २४ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे मार्गदर्शन करताना बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे असा आदेशयुक्त संदेश दिला होता. योग्य व सक्षम माणसे विहाराच्या व्यवस्थापनात आली तर अनिष्ट रूढी परंपरा नष्ट करण्यासाठी ते कार्य करू शकतील. परिणामी कब्जेधारी लोकांच्या ताब्यातून विहारे मुक्त होतील. ज्यामुळे विहारे ही चळवळीची संस्कार केंद्रे होतील. जनतेपर्यंत बुद्ध संदेश प्रचारीत करण्यासाठी होणाऱ्या संपर्क प्रक्रियेतील संवाद हे सुसंवादात परिवर्तित होण्याची आवश्यकता आहे. केवळ पुजा पाठ करून चालणार नाही तर बुद्ध समजून घेण्यासाठी आपण दर रविवारी बुद्ध विहारात गेलेच पाहिजे.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन एड. विलास रामटेके यांनी केले. यावेळी 'बुद्ध धम्माचे प्रवचन बाई कालच आले मी ऐकून आणि देवारे दिले फेकून' हे गीत वसंत सुरडकर यांनी सादर केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, सम्यक रामटेके, गौरव दुधमले, वसंत सुरडकर, एस. एस. वानखेडे, इंजिनिअर किशोर पाटील, भीमराज बोर्डे इत्यादी उपासक उपस्थित होते.

# महापरिनिर्वाण दिनी पंचशील बौद्धजन सेवा संघाचे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** पंचशील बौद्धजन सेवा संघ गोरेगाव विभाग यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील संबोधी विहार येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी स्मारकात जातन करण्यात आल्या आहेत. त्या ६ डिसेंबर, २०२४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाला संबोधी विहारात पवित्र अस्थी दर्शनाला ठेवण्यात आल्या होत्या. या ठिकाणीं अनेकांनी येवून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थींचे दर्शन घेतले. रायगड जिल्ह्यामध्ये एकमेव ठिकाणी गोरेगाव येथे पंचशील बौद्ध जन सेवा संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी जतन करून ठेवल्या आहेत. पंचशील बौद्ध जन सेवा संघ ही रायगड जिल्ह्यामध्ये नावजलेली सामाजिक संस्था आहे.



पंचशील बौद्धजन सेवा संघ गोरेगाव विभागचे अध्यक्ष आयु. विकास दादा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली ६ डिसेंबर, २०२४ रोजी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला बौध्दजन पंचायत समितीचे अध्यक्ष आयु चंद्रमणी साळवी, प्राध्यापक सोनवणे, म्हसळा तालुका सचिव आयु रुपेश गमरे, विश्वस्त सचिव संदीप साळवी, विश्वस्त डॉ. दिलीप साळवी, तुकाराम महाडिक महिला जिल्हा अध्यक्ष अस्मिता जाधव, पंचशील महिला सेवा संघाच्या अध्यक्षा सुप्रिया ताई साळवी यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून श्रध्दांजली अर्पण केली.

या कार्यक्रमाला मुंबई संघाचे कार्याध्यक्ष आयु. मुकुंद पवार, आयु. निलेश महाडिक, शैलेश साळवी, विजय जाधव, हिरामण महाडिक, आयु. रामदास जाधव, लक्ष्मण जाधव , वसंत जाधव, सुनील शिंदे, सौ. रेश्मा साळवी, सौ. सुवर्णा हाटे, सौ. सुवर्णा अहिरे, सुनंदा मोरे, अपर्णा लोखंडे, प्रिया लोखंडे, सौ. विजया गायकवाड या महिला संघाच्या पदाधिकारी उपस्थित होत्या. सर्वांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी चे दर्शन घेवून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## पान १ वरुन

### चांगल्या माणसाची ...

जीवनातील दुःख दूर होते, माणसाचे चित्त हे अत्यंत कोमल असते कोमल चित्ताने परमेश्वराचेव नामस्मरण करा जीवनाचे सार्थक होते, माणसाने कमावलेली संपत्ती ही फार काळ टिकणारी नसते, परंतु ती संपत्ती भगवंताच्या सत्कार्यास खर्च केल्यास त्या माणसाच्या जीवनात भरभराटी होते असे महाराजांनी बोलतांना सांगितले यावेळी धर्मपिठावर हभप प्रभाकर महाराज शास्त्री, डॉ. प्रदीप हुसे, डॉ. अंजली हुसे, शिवाजी शिंदे,उद्धव महाराज घनघाव, अरुण महाराज शिरसाठ बद्रीनाथ महाराज शेळके गजानन महाराज देठे यांची उपस्थिती होती तर पखवाज साथ संगत हभप हनुमान म.बलप, बळीराम महाराज गवारे, गायनाची साथ संगत सर्वश्री हभप नागेश महाराज नानकिल्ले तुळशीराम महाराज दाभाडे, निवृत्ती म. लकडे रवींद्र महाराज मदने, दादासाहेब महाराज पाटील, विलास बापू देशमुख, आबासाहेब महाराज बोरुडे यांनी केली

### जालना येथे ...

जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योगांच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, राष्ट्रीय पशुधन योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी ,मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.१६ डिसेंबर २०२४ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन के डी दांडगे मिटकॉन जालना यांनी केले आहे.

### महापरिनिर्वाण ...

जिल्ह्यासह मराठवाड्यातील मुंबई येथे हल्ली तात्पुरत्या स्वरूपात वास्तव्यास असणाऱ्या स्थलांतरित मतदारांनी ३ ते १६ डिसेंबर २०२४ दरम्यान वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या राज्यव्यापी ईव्हिएम विरोधी स्वाक्षरी मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांनी केले आहे.

### ब्रह्माकुमारी ...

विकासावर आधारित आहे.

महेश व्याख्यानमाला ही जालनावासीयांसाठी एक महत्त्वाची संधी असून, जीवनातील अडथळे दूर करण्याचा मार्ग शोधण्यासाठी आणि सुख-शांतीचा अनोखा अनुभव घेण्यासाठी या व्याख्यानमालेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

# भारतीय संविधान व लोकशाही विषयी जागृती करण्याची गरज- डॉ. सोनकांबळे

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय संविधान व लोकशाहीचा विचार करणारी पिढी निर्माण झाली तरच देशातील संविधान व लोकशाही अबाधित राहील, असा विश्वास छत्रपती संभाजीनगर येथील फुले-शाहू- आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक व लेखक प्रा. डॉ. ह. नि. सोनकांबळे यांनी येथे व्यक्त केला.

भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव, संविधान गौरव दिन, महात्मा जोतिबा फुले स्मृतिदिन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वान दिनानिमित्त जालना शहरातील संविधान जनजागृती संघातर्फे शुक्रवारी ( दि. ६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते. कामगार चळवळीचे नेते अण्णा सावंत हे यावेळी अध्यक्षस्थानी होते. उद्घाटक म्हणून संविधान जनजागृती संघाचे मार्गदर्शक भारत खंदारे तर प्रमुख अतिथी म्हणून अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर यांची यावेळी उपस्थिती होती. विचारपीठावर संविधान जनजागृती संघाचे अध्यक्ष दादाराव हिवराळे,सचिव प्रकाश गडवे, कार्याध्यक्ष सदानंद टवले आदींची उपस्थिती होती.

'भारतीय संविधान: लोकशाहीची सद्य :स्थिती आणि भवितव्य' या विषयावर विचार मांडतांना प्रा. डॉ. सोनकांबळे पुढे म्हणाले की, भारतीय संविधान हे जगात सर्वश्रेष्ठ आहे, आपल्या देशांमध्ये लोकशाही गणराज्य स्थापित आहे व प्रत्येक व्यक्तीचे हक्क व अधिकार आज केवळ संविधानामुळेच अबाधित आहेत. भारतात समता, बंधुता, न्याय प्रस्थापित करण्यासाठी सविधानाचे मोलाचे योगदान आहे. देशाच्या प्रगतीमध्ये त्याचा मुख्य आधार भारतीय संविधान आहे. एक मत, एक मूल्य हा अधिकार भारतीय संविधानाने दिला आहे. सहा हजार पेक्षा जास्त समूह असलेल्या या देशात ७५ वर्षात लोकशाही जिवंत ठेवण्यामध्ये संविधानाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राजकीय लोकशाहीपेक्षा सामाजिक लोकशाही अभिप्रेत होती, राजकीय क्रांती ही सामाजिक क्रांतीच्या पोटातून जन्माला येते. भारतात सामाजिक क्रांतीचा पाया रचला गेला नाही, ही खेदजनक बाब आहे, देशात सामाजिक व आर्थिक विषमतेवर तोडगा निघालेला नाही.सरकार हे नागरिकांच्या मुलभूत अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी असते, मुलभूत अधिकाराचे संरक्षण करणारी शासन यंत्रणा आज निर्माण होण्याची गरज आहे. आज भारतीय संविधान बदलण्याची भाषा केली जात आहे. भारतीय संविधान बदलणे कदापि शक्य नाही, संविधान व लोकशाही टिकवायची असेल तर प्रत्येकाने संविधानाचे पारायण करण्याची गरज आहे, संविधान विषयक जनजागृती करणे आवश्यक आहे. तरुण पिढीला संविधान व लोकशाही समजून सांगितली तरच पुढे संविधान व लोकशाही टिकेल, असा विश्वासही प्रा. डॉ. सोनकांबळे यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना डॉ. राजेंद्र गाडेकर यांनी आपल्याला महापुरुषांचे विचार विसरून चालणार नाही, असे सांगून सत्यप्रियता, मानवता, निर्भयता व कारुण्यता असलेली व्यक्तीच महापुरुषांच्या विचारांचे पाईक होऊ शकेल, एक दिवस भारत हा सम्राट अशोक यांचा देश निर्माण होईल, असा विश्वासही डॉ. गाडेकर यांनी यावेळी व्यक्त केला.

उद्घाटक भारत खंदारे यांनीही यावेळी आपले विचार मांडले. अध्यक्षीय समारोप करताना कामगार नेते अण्णा सावंत म्हणाले की, लोकशाहीचे चार स्तंभ हे कमजोर झाले आहेत. संविधान व लोकशाही वाचवण्यासाठी प्रत्येक समाज घटकातील बुद्धीजीवींनी पुढाकार घेतला पाहिजे, सामाजिक क्रांतीचे नेतृत्व बुद्धिजीवी वर्गाने करावे, असे आवाहनही सावंत यांनी यावेळी केले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आले. प्रा.



मनोज गवळी यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले. दादाराव हिवराळे यांनी प्रास्ताविक केले. संचलन प्रकाश गडवे यांनी केले तर सदानंद टवले यांनी आभार मानले.

यावेळी संविधान जनजागृती संघाचे उपाध्यक्ष मिलिंद धनेधर, सहसचिव केशव पगारे,कोषाध्यक्ष शंकर भालेराव, तसेच महाजन सोनकांबळे, सोनाजी नावकर,कृष्णाजी ढगे, रामदास गवई, शरद नरवडे, डॉ. के. जी. सोनकांबळे, डॉ. कालिदास सूर्यवंशी, सोपान खंदारे,डॉ. यशवंत सोनुने,सुभाष साळवे, वसंत पडघन, डॉ. प्रियदर्शन भवरे,जी.आर.चिकटे, राजेश मुळे, प्रा. विजय पगारे, राजाभाऊ मगर डॉ. प्रतिभा भद्रे यांच्यासह संविधान जनजागृती संघाचे पदाधिकारी ,संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अवैध वाळू वाहतुकीचा ट्रॅक्टर पकडला

### नायब तहसीलदार साबळेच्या नेतृत्वात तहसील पथकाची विशेष कामगिरी



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** नायब तहसीलदार मंगेश साबळे तहसील कार्यालय जाफराबाद तहसीलच्या विशेष पथकाने टेंभुर्णी जवळून जवळच असलेल्या डावरगाव देवी पांदी रस्त्याने अवैध वाळू उपसा चालू असताना वाळू ने भरलेला ट्रॅक्टर पकडला. सध्या तहसील ऑफिसच्या तर्फे विशेष पथक निर्माण करण्यात आली आहे. अवैध बाळू साठे च्या विरोधात मोहीम राबवलेले जात आहे. हा ट्रॅक्टर पकडण्यात आला आणि टेंभुर्णी पोलीस स्टेशनला जमा करण्यात आला पुढील कार्यवाही सपोनी सचिन खामगळ यांच्या नेतृत्वात पुढील तपास चालू आहे. हे कारवाई केली त्या कारवाई मध्ये तहसील ऑफिसचे नायब तहसीलदार मंगेश साबळे , टेंभुर्णी चे टेंभुर्णी चे मंडळ अधिकारी एस के कपूर साहेब, तलाठी राम धनेश, विशेष पथकातील तलाठी हरिभाऊ इंगळे, साळवे, राजू खांडेभराड, पोलीस कर्मचारी सागर शिवरकर, डी टी ठाकरे, हे होते. तसेच अनेक नागरिकांनी आमच्या वृत्त प्रतिनिधी बोलताना सांगितले, अवैध वाहतूक करणारे रात्रभर हे ट्रॅक्टर चालू असतात त्यांचा कर्ण कर कशा आवाज नागरिकांची झोप उडवतात, अशा वाहनांवर पोलीस स्टेशन व आरटीओ कार्यालयांनी लगान घालायला पाहिजे, तसेच या वाहनांवर नंबर प्लेटच नसते त्यामुळे कोणाचे वाहन आहे कळायला मार्ग नसतो, अपघात झाल्यास कोणाचा तर्फे अपघात झाला हे समजायला मार्ग नसतो.

## नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती जे बी के विद्यालय येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालय श्रीमती जे बी के विद्यालय टेंभुर्णी येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य नंदकुमार काळे हे होते, प्रमुख पाहुणे म्हणून नवभारत शिक्षण संस्थेचे संचालक तथा उप प्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, उपमुख्याध्यापक पंजाबराव सोळंके, पर्यवेक्षक धनंजय पुराने, आदींची उपस्थिती होती, याप्रसंगी झालेल्या अभिवादन कार्यक्रमांमध्ये दिवसान ससाने यांनी महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उलगडला. भारतातील समाजासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अत्यंत महत्त्वाचा असून भारतीय समाजामध्ये समानता निर्माण करण्याचा प्रयत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. समता बंधुत्व ही संकल्पना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संकल्पित करून, भारतीय राज्यघटना निर्माण केली धर्मनिरपेक्ष समाजवादी राज्यघटना निर्माण करण्याचे श्रेय व जगातील उत्कृष्ट लोकशाहीचा मोठा ग्रंथ निर्माण करण्याचं कार्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेला आहे. त्यांनी जीवनामध्ये अनेक संघर्ष केला. आपल्या ज्ञानाचा समाजाला फायदा होईल याकडेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी बघितले. त्यांच्या जाण्याने मी एका विद्वानाची पोकळी भारतीय समाजात निर्माण झालेली आहे.



डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी शाळेतील सखाराम बोरकर, विष्णू जाधव, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, राजेंद्र जगताप, रवींद्र मोरे, गणेश संवसाक्के, दत्ता उखर्डे, रमेश इंगळे, संजय कुलकर्णी, वासुदेव क्षीरसागर, समाधान कांबळे, भिलावेकर मॅडम, पाटील मॅडम, कळंबे मॅडम, लंबे मॅडम, राजू डोमळे, नागोराव देशमुख, दीपक देशमुख, इत्यादी शिक्षकाने अभिवादन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

## परमपूज्य महेश गिरी बाबा यांचे पुंजाराम बाबा पुण्यतिथी निमित्त प्रवचनाचा कार्यक्रम

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील परमपूज्य संत पुंजाराम बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी महाप्रसादाचा आयोजन केल्या जाते. संत पुंजाराम बाबा यांचे भक्त खरात मळा येथे आयोजित केल्या जाते. या ठिकाणी त्रंबकेश्वर मंदिर आणि परमपूज्य संत पुंजाराम बाबा यांच्या स्मृती मंदिराच्या ४ थ्या वर्धापन दिनानिमित्त परम पूज्य संत महेश गिरी महाराज मठाधिपती जनार्दन स्वामी आश्रम गोंदनखेडा यांचे प्रवचन होणार असून दि. १०/१२/२०२४, वार- मंगळवार ठीक दुपारी १:00 वाजता* होईल आणि



त्यानंतर लगेच महाप्रसादाचे आयोजन दु. २ ते ५ वाजेपर्यंत केलेले आहे. सर्व भाविक भक्तांनी दर्शन आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा. प्रा. दिपक प खरात, संदीप प खरात व खरात परिवार टेंभुर्णी यांनी केले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महामानवाला महापरिनिर्वाण दिनानिमित्त ग्राम संसद कार्यालय टेंभुर्णी येथे बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी ग्रामविकास अधिकारी जगदीश आढाव उपसरपंच शिवाजी मामा मुळे ग्रामसंसद सदस्य विष्णू भाऊ जमधडे पांडुरंग बोरसे संतोष पाचे गजानन अंधारे किशोर कांबळे कर्मचारी विक्रम उकांडे अजिस बागवान दिगंबर भिसे सुनिल भाले रामदास धनवई सुभाष घोडे सुपरवायझर रेखा सपकाळ सर्व आशा ताई अंगणवाडी ताई मदनीस उपस्थित होते.

## सुंदरनगर, गवारे नगर येथे विद्यूत डिपीच्या समस्येने नागरीक त्रस्त

### उपअभियंता साखर झोपेत; नागरीकांचा आरोप

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील सुंदर नगर, गवारे नगर येथील विद्युत डीपीच्या विविध समस्येने नागरिक त्रस्त झाले असून अनेक वेळा महावितरणच्या उपअभियंताकडे तक्रारी करूनही महावितरणचे अधिकारी लक्ष देत नसून साखर झोपेमध्ये असून जेव्हापासून महावितरणचे नविन उपअभियंता रुजू झाले तेव्हा पासून त्यांनी चंदनझीरा,सुंदरनगर,गवारे नगर येथील नागरीकांच्या समस्या तर जाणून घेतल्या नसल्याचे नागरिकांचा आरोप आहे.

गवारे नगर येथील दक्षिण मुखी चौक येथे विद्युत रोहित्र असून हे रोहित्र जमीन लेवल असल्याने या ठिकाणी लहान लेकरांच्या जीवितास धोका असून २४ तास फ्यूज उघडे असतात या डीपीवर नेहमी शाट सर्किट होत असते तसेच याबाबतीत अनेक वेळा महावितरणच्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना नागरिकांनी तक्रारी केलेल्या आहेत परंतु कोणीही याकडे लक्ष द्यायला तयार नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच गवारे नगर-सुंदरनगर ते महामार्गापर्यंत मुख्य डीपी रस्त्याचे काम सध्या चालू आहे. परंतु या रोहीत्राची



हाईट अत्यंत कमी म्हणजेच जमीन लेवल असल्यामुळे रोडचे काम रखडलेले आहे. काल महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी या ठिकाणी पाहणी केली असून त्यांच्यासमोर नागरिकांनी महावितरणचे उपअभियंता बनकर यांना मोबाईलद्वारे संवाद साधला असता त्यांनी स्पष्ट सांगितले की रोहीत्राबाबत उपाययोजना करण्याचे काम आपल्या हाती नसून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अख्त्यारीमध्ये येत असल्याचे त्यांनी सांगून टाळाटाळ केली. आज दिनांक ०६ शुक्रवार रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास परिसरातील नागरिकांनी याविषयी माध्यमांशी संवाद साधला आणि लवकरात लवकर या विद्युत डीपीच्या तसेच याच प्रकारे तीन ते चार डीपी ची समस्या आहेत त्या लवकरात लवकर सोडवाव्यात अशी मागणी करण्यात आली.

संबंधित विभागाने तात्काळ उपाययोजन न केल्यास परिसरातील नागरीकांच्या वतीने महावितरण विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा ईशारा नागरीकांच्या वतीने देण्यात आला आहे.

## यशवंत व्याख्यानमाला संयोजनसमितीच्या अध्यक्षपदी प्रा चत्रभुज गोडबोले

**अंबड । प्रतिनीधी -** छत्रपती शिवरायांच्या जयंतीप्रित्यर्थ यशवंत प्रतिष्ठान, शेवगा ता अंबड जि. जालनाच्या वतीने आयोजित यशवंत व्याख्यानमाला फेब्रुवारी २०२५ संयोजनसमितीच्या अध्यक्षपदी प्रा चत्रभुज गोडबोले , सचिवपदी आदित्य पवार तर कार्याध्यक्षपदी रमेश वराडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आल्याचे यशवंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री संजय खोरे यांनी सांगितले. मागील चौदा वर्षापासून अंबड शहरात शिवजयंतीच्या निमित्ताने यशवंत व्याख्यानमालेचे आयोजन यशवंत प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येते. मराठवाड्यातच् नव्हे तर महाराष्ट्रात प्रसिद्ध असणाऱ्या यशवंत व्याख्यानमालेत् महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील व्याख्यात्यांनी विविध विषयावर आपले विचार मांडलेले आहेत.

दरवर्षीप्रमाणे याहि वर्षी शिवजयंतीप्रित्यर्थ यशवंत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते सुदाम मुकणे यांच्या अध्यक्षतेखाली स्वामी विवेकानंद वाचनालयात शहरातील विविध क्षेत्रात कार्यरत कार्यकर्त्याची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीत आगामी वर्षात यशवंत प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या यशवंत व्याख्यानमालेच्या संयोजन समितीची निवड करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

सर्वानुमते प्रा चत्रभुज गोडबोले यांची अध्यक्ष म्हणून ,आदित्य पवार यांची सचिवपदी , कार्याध्यक्षपदी रमेश वराडे यांची निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारणी मध्ये उपाध्यक्ष पत्रकार नाजीम सय्यद,विष्णू पुंड,रवी इंगळे तर सदस्य म्हणून डॉ गोपाल अडाणी,अल्ताफ शेख,डॉ मुरली जाधव,डॉ राहुल बागुल,राहुल साळवे,लक्ष्मण काळे, राजेश भापकर यांची निवड करण्यात आली.

सिद्धार्थ रोटे,ओमप्रकाश उबाळे,कुमार रूपवते,राजीव डोंगरे, जितेंद्र बुर्ले , गणेश वाडेकर,पत्रकार संतोष जिगे,पत्रकार अशोक डोरले,प्रा डॉ श्रीधर कापसे,जगदीश वाग्रुळकर, मुस्तकीम पटेल,प्राचार्य चंद्रशेखर जगताप हे मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. सदरील संयोजन समिती येणारी यशवंत व्याख्यानामाला आणि वर्षभरातील नियोजित कार्यक्रमाची अंमलबजावणी करणार आहेत.

यशवंत प्रतिष्ठानच्या यशवंत व्याख्यानमालेत येणाऱ्या दर्जेदार वक्त्यांची उज्ज्वल परंपरा कायम ठेवून येणाऱ्या वर्षात अंबड शहर व परिसरातील श्रोत्यांना वैचारिक ,साहित्यिक व सांस्कृतिक मेजवानी देण्याचा आमचा प्रयत्न राहील असा विश्वास नवनिर्वाचित अध्यक्ष श्री चत्रभुज गोडबोले व सचिव आदित्य पवार यांनी व्यक्त केला.

सदरील बैठकीस यशवंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री संजय खोरे, स्वामी विवेकानंद वाचनालयाचे अध्यक्ष शिवाजी धुपे, सचिव राहुल साळवे यांची उपस्थित होती.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात समाजकार्य महाविद्यालयाचा सहभाग



**जालना । प्रतिनिधी -** दि. ०५ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना व नेहरू युवा केंद्र जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात जालना समाजकार्य महाविद्यालयाच्या विदयार्थ्यांनी प्राचार्य डॉ.राजकुमार म्हस्के व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिपक बुक्तरे व प्रशासकीय अधीकारी रमेश गजर यांच्या मार्गदर्शनाखाली वक्तृत्व स्पर्धा, कविता लेखन, मोबाईल फोटोग्राफी, लोकगीत, लोकनृत्य स्पर्धेत सहभाग घेतला या स्पर्धेत कविता लेखन या स्पर्धेत योगेश खोसे यांनी तृतीय क्रमांक पटकावला या स्पर्धेत राजू वाघमारे, आकाश आढे, योगेश पवार, योगेश खोसे,रोहन राठोड या विदयार्थ्यांनी सहभाग घेतला.या स्पर्धेत परीक्षक म्हणून प्रा. डॉ. दिपक बुक्तरे, मिलिंद सावंत,निलेश प्रधान,प्रा. डॉ. रेणुका बडवणे, कांचन वाघ,प्रा.डॉ.सुधीर गायकवाड,आशिष हेलगे,प्रा. डॉ. नरसिंग पवार, गणेश नागवे, सुजित शिंदे, डॉ. बी. जी. श्रीरामे, एस. एस. जोशी हे उपस्थित होते.

# लॉयन्स क्लब ऑफ परतुर च्या वतीने तीन दिवसीय कराटे प्रशिक्षण शिबिर संपन्न




**परतूर । प्रतिनिधी -** लॉयन्स क्लब ऑफ परतुर च्या वतीने शालेय मुलींना आत्मसंरक्षण चे प्रशिक्षण कस्तुरबा गांधी विद्यालय आंबा येथे दि.०५ डिसेंबर ते ०७ डिसेंबर तीन दिवसीय आत्मसंरक्षण शिबिर घेण्यात आले आहे. परतूर शहरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून लॉयन्स क्लब ऑफ परतूर. यांच्या वतीने वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करून उपक्रम राबवत आलेले आहेत. यामध्ये हा एक महत्वाचा कार्यक्रम मुलींनी स्वतःचं रक्षण करावं यासाठी हा उपक्रम राबवण्यात आलेला आहे. या वेळी , लॉयन्स क्लबचे अध्यक्ष, लॉ. प्रमोद टेकाळे.सचिव,लॉ. मुकुंद शेपाळ. कोषाध्यक्ष,लॉ. मधुकरराव भोसले.डॉ. दत्तात्रेय नंद.डॉ.सौ. भक्ती नंद. कस्तुरबा गांधी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, साळवे ज्योती बन्सीधर. शिक्षिका, संगीता गोरे. कुलकर्णी शीतल. जाधव राजश्री. खवणे मंगल. वायकोस नयना. घुले देउबाई. ब्रह्मा रंगारी यांच्या उपस्थितीत तीन दिवसीय शिबिराला सुरुवात करण्यात आली होती. परतुर येथील सोतोकान कराटे च्या विद्यार्थ्यांनी शिबिराच्या पहिल्या दिवशी सेल्फ डिफेन्स कसे करावे याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. पूर्वा मॅकेवार. राबिया सिद्दिकी. वैष्णवी आढाव. समृध्दी गाढवे. श्रावणी लोहगावकर. रिहान शेख. शेख मोहम्मद मलिक. ध्रुव सोळंके.शिवम मोताळे. श्रीतेज भामट. यांनी कराटे प्रात्यक्षिक करून दाखवले. कराटे मास्टर, माणिक जैस्वाल यांच्या सहकार्याने कस्तुरबा गांधी विद्यालय आंबा येथील शालेय मुलींना आत्मसंरक्षण प्रशिक्षणा चा लाभ या शिबिरामुळे घडला आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.